

नागरिकांच्या रेकॉर्डब्रेक गर्दीने पवनाथडी जत्रेचा समारोप

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 3रे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 26/02/२०२५ METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 53 || RNI - MAHMAR/2021/51259 || metrocity924@gmail.com


# आदिवासी क्षेत्राचा समतोल विकास साधणार - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रस्त्यावर हो णारे वादाचे प्रसंग टाळणे, अपघातग्रस्तांना तातडीने मदत करण्यासाठी मुंबई पोलिसांच्या धर्तीवर पुणे पोलिसांनी वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली आहे. प्रशिक्षण सत्रात सहभाग झालेल्या पहिल्या तुकडीतील ६५ पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

मुंबईच्या धर्तीवर पुणे पोलीस दलात वाहतूक शाखेत काम करणाऱ्या पोलिसांसाठी प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात येणार आहे. अद्याप या प्रशिक्षण संस्थेस जागा उपलब्ध झाली नाही. मुंबई पोलीस दलात वाहतूक शाखेत नियुक्ती हो ण्यापूर्वी पोलिसांना प्रशिक्षण देण्यात येते. पुण्यातही वाहतूक पोलिसांना प्रशिक्षण देण्यासाठी पोलीस दलांतर्गत संस्था सुरू करण्यात येणार आहे. वाहतूक



पोलिसांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली असून, पहिल्या तुकडीतील पाच अधिकारी आणि ६० पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. पोलीस आयुक्तालयात मंगळवारी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते प्रशिक्षण पूर्ण केलेले अधिकारी आणि पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे वाहतूक शाखेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना वाहन कायदा, तंत्रज्ञान, इ-चलन यंत्राचा योग्य वापर, नागरिकांशी संवाद कौशल्य, अपघातग्रस्तांवर तातडीने करण्यात येणारे उपचार याबाबतची माहिती मिळाली आहे. वाहतूक नियमन करताना पोलिसांनी या प्रशिक्षण वर्गाचामुंबई : आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कसोशीने प्रयत्न करीत आहे. त्याकरिता विविध योजनांची अंमलबजावणी सुरू आहे. आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असून सीएसआर निधीच्या माध्यमातून समतोल विकास साधला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

आदिवासी विकास विभाग आणि संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यूएनडीपी) द्वारे सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण व आरोग्य सेवा जलदगतीने उपलब्ध होणे आवश्यक आहे. सीएसआर निधी केवळ महानगर प्रदेशात खर्च न करता समतोल विकासासाठी उपयोग करावा. तसेच या निधीच्या माध्यमातून शिक्षण व आरोग्य क्षेत्रात अधिकाधिक योगदान द्यावे.

आदिवासी समाजाला फार मोठा इतिहास व सांस्कृतिक वारसा आहे. या समाजामध्ये नियम, कायदा आणि मूल्ये होती. मात्र कालचक्राच्या ओघात हा समाज मागे पडला. या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामार्फत अनेक योजना राबविल्या जात आहेत. या योजनांच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात नवी उमेद निर्माण करण्यात येत आहे. गर्भवती माता आणि बालकांना पोषण आहार मिळावा, यासाठी शासन विविध योजना राबवत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास 9.5% लोकसंख्या आदिवासी समाजाची आहे तर देशाच्या एकूण आदिवासी लोकसंख्येच्या 10% लोकसंख्या ही महाराष्ट्रामध्ये आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आदिवासींचे अधिवास असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. आदिवासी समाजातील मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण व नैसर्गिक गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी नामांकित शाळांमध्ये प्रवेश देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. उपयोग होणार आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

# अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते होणार युवोत्सव क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे निगडी येथील पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचलित एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये "युवोत्सव २०२५" या आंतर महाविद्यालयीन भव्य क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन गुरुवारी (दि.२७) सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. शनिवारी (दि. १ मार्च)



मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. युवोत्सव स्पर्धेच्या आयोजनाचे हे दहावे वर्ष आहे. या स्पर्धेमध्ये फुटबॉल, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बॉक्स क्रिकेट या स्पर्धांचा समावेश आहे. युवोत्सव क्रीडा स्पर्धेमध्ये पुणे परिसरातील पदवी आणि पदव्युत्तर महाविद्यालयामधील संघ सहभागी होणार आहेत. विजयी संघांना आकर्षक बक्षिसे व रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत, अशी माहिती एसबीपीएमच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी प्रसिद्धीस दिली आहे. स्पर्धेचे आयोजनात डॉ. अनिषकुमार कारिया, डॉ. काजल माहेश्वरी, डॉ. अमरीश पद्मा यांनी सहभाग घेतला आहे.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली युवोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 26/02/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने जेष्ठ नागरिकांना आयुष्मान कार्ड वाटप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने आयुष्मान भारत वय वंदना स्मार्ट कार्ड योजना सुरू करण्यात आली आहे.

आयुष्मान वय वंदना कार्ड हे सामाजिक-आर्थिक स्थिती न पाहता 70 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना पाच लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण प्रदान करते.

हे कार्ड सुमारे 2000 वैद्यकीय प्रक्रियांचे उपचार देते आणि कोणत्याही प्रतीक्षा कालावधीशिवाय पहिल्या दिवसापासून सर्व विद्यमान आजारांना कव्हर करते.

आतापर्यंत नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्या माध्यमातून १४०० पेक्षा जास्त जेष्ठ



नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

नगरसेवक शेडगे यांच्या जनसंपर्क कार्यालयात दररोज ७० पेक्षा जास्त वय असलेल्या जेष्ठ नागरिकांना आयुष्मान भारत वय वंदना या योजनेचे लाभार्थी करून घेतले जाते व त्यांना मोफत स्मार्ट कार्ड दिले जाते. आयुष्यमान भारत 'वय वंदना विमा' योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित स्वतः व्यक्ती व त्याचे आधारकार्ड आणि आधारकार्डला लींक असलेला मोबाईल नंबर असणे आवश्यक आहे.

## परळी,बारामती येथील पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालयांना मंजूरी

परळी (जि. बीड) व बारामती (जि.पुणे) येथे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालयांच्या स्थापनेस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या दोन्ही महाविद्यालयांसाठी बांधकाम, वेतन व अनुषंगीक बाबींसाठी प्रत्येकी ६७१ कोटी ७७ लाख ९३ हजार रुपये खर्चाच्या तरतूदीसही मंजूरी देण्यात आली.या निर्णयानुसार बीड जिल्ह्यातील मौजे परळी येथे ७५ एकर जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तर बारामती तालुक्यातील महाविद्यालयासाठी कऱ्हावागज येथे ८२ एकरची जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या दोन्ही महाविद्यालयांची प्रवेश क्षमता प्रत्येकी ८० विद्यार्थी इतकी असणार आहे.

# शहरात 1 मार्चपासून जापनीज एन्सेफलायटीस प्रतिबंधक लसीकरण मोहीम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलत, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे १ मार्च २०२५ पासून जापनीज एन्सेफलायटीस अर्थात जेई प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. जेईहा विषाणूजन्य आजार असून, तो प्रामुख्याने १५ वर्षांखालील मुलांना होतो. या आजारामुळे गंभीर मज्जातंतू विकार होण्याची शक्यता असते, तसेच याचा मृत्यूदरही अधिक आहे. जेई सिंड्रोम हा देशातील सार्वजनिक आरोग्य समस्यांपैकी एक आहे. कारण यामुळे मृत्यूचे प्रमाण सुमारे ३० टक्के आहे, आणि ३०-४० टक्के बरे झालेल्या मुलांमध्ये विशिष्ट परंतु मज्जातंतूशी संबंधित अपंगत्व आयुष्यभर राहते. त्यामुळे या आजारापासून बचावासाठी लसीकरण करण्याचे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे करण्यात आले आहे.

**लसीकरण मोहीमेचे स्वरूप**

- १ मार्च २०२५ पासून संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरात ही मोहीम राबविली जाणार.
- १ ते १५ वर्षे वयोगटातील सर्व मुलांचे शाळा आणि समाज स्तरावर मोफत लसीकरण करण्यात येणार.
- राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत ही लस सुरक्षित आणि प्रभावी आहे.

शाळा आणि पालकांनी सहकार्य करण्याचे आवाहन सोमवारी (२४ फेब्रुवारी) पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागातर्फे याबाबत बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीमध्ये शाळांचे आणि पालकांचे सहकार्य आवश्यक असल्याचे मत उपस्थितांनी मांडले. तसेच विद्यार्थ्यांना जेई प्रतिबंधक लसीकरणाचे महत्त्व पटवून द्यावे, पालकांसाठी जनजागृती सभा आयोजित कराव्यात, शाळेतील विद्यार्थ्यांची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्यावी, लसीकरण सत्रासाठी जागा आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, सर्व विद्यार्थ्यांनी लस घेतली आहे याची खात्री करावी, अशा विविध सूचना देण्यात आल्या.

ही बैठक महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांच्या सूचनेनुसार, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयाचंद्र दादेवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलावडे,

सर्व्हेलन्स मेडिकल ऑफिसर डॉ. चेतन खाडे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. वर्षा डांगे आणि इतर नोडल अधिकारी उपस्थित होते.

# वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण



रस्त्यावर होणारे वादाचे प्रसंग टाळणे, अपघातग्रस्तांना तातडीने मदत करण्यासाठी मुंबई पोलिसांच्या धर्तीवर पुणे पोलिसांनी वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली आहे. प्रशिक्षण सत्रात सहभाग झालेल्या पहिल्या तुकडीतील ६५ पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. मुंबईच्या धर्तीवर पुणे पोलीस दलात वाहतूक शाखेत काम करणाऱ्या पोलिसांसाठी प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात येणार आहे. अद्याप या प्रशिक्षण संस्थेस जागा उपलब्ध झाली नाही. मुंबई पोलीस दलात वाहतूक शाखेत नियुक्ती होण्यापूर्वी पोलिसांना प्रशिक्षण देण्यात येते. पुण्यातही वाहतूक पोलिसांना प्रशिक्षण देण्यासाठी पोलीस दलांतर्गत संस्था सुरू करण्यात येणार आहे. वाहतूक पोलिसांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली असून, पहिल्या तुकडीतील पाच अधिकारी आणि ६० पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. पोलीस आयुक्तालयात मंगळवारी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते प्रशिक्षण पूर्ण केलेले अधिकारी आणि पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे वाहतूक शाखेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना वाहन कायदा, तंत्रज्ञान, इ-चलन यंत्राचा योग्य वापर, नागरिकांशी संवाद कौशल्य, अपघातग्रस्तांवर तातडीने करण्यात येणारे उपचार याबाबतची माहिती मिळाली आहे. वाहतूक नियमन करताना पोलिसांनी या प्रशिक्षण वर्गाचा उपयोग होणार आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 26/02/२०२५

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# बोलक्या भिंती उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मिळाली चालना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : शाळेच्या भिंती केवळ चार भिंती नसतात, तर त्या ज्ञान, सर्जनशीलता आणि प्रेरणांचा खजिना असतो. या भिंती आता 'बोलक्या भिंती' या उपक्रमामुळे बोलक्या झाल्या आहेत, ज्या विद्यार्थ्यांना शिकण्याची, विचार करण्याची आणि स्वतःच्या कल्पनांना रंग देण्याची संधी देत आहेत. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांची सर्जनशीलता विकसित व्हावी आणि शाळेचे वातावरण अधिक आनंददायी व्हावे हा या उपक्रमामागचा उद्देश आहे, असे मत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी व्यक्त केले.

महापालिकेच्या चिंचवड येथील मरहूम फकीरभाई पानसरे उर्दू प्राथमिक शाळेमध्ये आकांक्षा फाऊंडेशन व शाळा व्यवस्थापन समितीच्या १५ सदस्यांच्या सहकार्याने प्रायोगिक तत्वावर बोलक्या भिंती हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगिता बांगर, मुख्याध्यापक अब्दुस सलाम इनामदार, पर्यवेक्षिका हमिदा मोमीन, सुनंदा मगर यांच्यासह शाळेतील शिक्षक, आकांक्षा फाऊंडेशनचे प्रतिनिधी, शाळा व्यवस्थापन समितीमधील सदस्य तसेच पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



विद्यार्थ्यांनी शाळेच्या भिंतीवर रेखाटली विविध प्रकारची रंगीबेरंगी चित्रे

बोलक्या भिंती उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतः चित्रं काढून शाळेच्या भिंती रंगीबेरंगी केल्या आहेत. त्यामध्ये विविध प्रकारची निसर्गचित्रे, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे आणि प्रेरणादायी संदेश विद्यार्थ्यांनी भिंतींवर रेखाटली आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ कलागुणच नव्हे, तर एकत्रित काम करण्याची भावना निर्माण झाली आहे. याशिवाय शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना रंगसंगती, रेखाटन आणि भिंतींवर चित्रे काढण्याच्या तंत्राचे प्रशिक्षण देखील देत आहेत. यामध्ये त्यांना आकांक्षा फाऊंडेशनच्या सदस्यांचीही मदत लाभत आहे. या उपक्रमामध्ये पालकांनाही सहभागी करून घेण्या येत असून शाळेच्या भिंती सुंदर झालेल्या पाहून पालकांनी देखील आनंद व्यक्त केला आहे. तसेच काही पालकांनी या उपक्रमासाठी शाळेला सहकार्य करण्याची तयारी देखील दर्शविली आहे.

बोलक्या भिंती उपक्रम हा केवळ शाळा सौंदर्यासाठी राबविण्यात येणार नसून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि सर्जनशील विकासासाठी हे एक महत्वाचे पाऊल आहे. भिंतींवरील विविध प्रेरणादायी संदेश, रंगसंगती, रेखाटने यामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळेल आणि त्यांना विविध गोष्टी शिकण्यात अधिक आनंद मिळेल. पालकांचा सहभाग हा या उपक्रमाचा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे, कारण यामुळे शाळा आणि पालक यांच्यातील नाते अधिक दृढ होईल. सध्या प्रायोगिक तत्वावर एका शाळेमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत असून कालांतराने इतर महापालिका शाळांमध्येही हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

महापालिका शाळेमध्ये 'बोलक्या भिंती' हा उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षणच नव्हे, तर त्यांच्या सर्जनशीलतेलाही चालना मिळेल. चित्रे, विविध माहितीपर मजकूर आणि आकर्षक रंगसंगतीमुळे मुलांच्या कल्पकतेला अधिक चालना मिळेल. या उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षणाच्या पद्धतीत एक सकारात्मक बदल घडून येईल आणि मुलांमध्ये शाळेबद्दल आकर्षण निर्माण होण्यास मदत मिळेल.

-विजयकुमार थोरात, सहाय्यक आयुक्त शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

बोलक्या भिंती या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि त्यांना शिकण्याची नवी प्रेरणा मिळेल. चित्रांच्या आणि रंगसंगतींच्या माध्यमातून मुलांना अवघड संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगता येतील. शिवाय, शाळेचे वातावरण अधिक प्रेरणादायी आणि आनंदी राहील, ज्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत यायला अधिक उत्साह वाटेल. अभ्यासाबरोबरच कला, सर्जनशीलता आणि नवकल्पनांना वाव मिळावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

-सलाम इनामदार, मुख्याध्यापक, मरहूम फकीरभाई पानसरे उर्दू प्राथमिक शाळा, चिंचवड

# फ्लॅट खरेदीच्या बहाण्याने साडेचार लाखांची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : फ्लॅट खरेदी करून देतो, असे सांगून एका व्यक्तीकडून वेगवेगळी कारणे सांगत चार लाख ६७ हजार ८३२ रुपये घेतले. ही रक्कम फ्लॅटच्या मालकाला दिली असल्याचे भासवून स्वतःच्या फायद्यासाठी वापरून फसवणूक केली. ही घटना ५ एप्रिल २०२४ ते २७ सप्टेंबर २०२४ या कालावधीत रुपीनगर, तळवडे येथे घडली. मोईन शकील शिकीलकर (३३, रा. तळेगाव दाभाडे) असे संशयिताचे नाव आहे. याप्रकरणी ३७ वर्षीय व्यक्तीने चिखली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित मोईन याने फिर्यादी यांना सदनिका खरेदी करून देतो, असे सांगितले. त्यानंतर कर्ज प्रकरण, सदनिकेचा जीएसटी, कर्जाकरिता स्टॅम्प पेपर,




रहिवासी दाखला, पोलिस व्हेरिफिकेशन आणि विमा पॉलिसी अशा विविध नावाखाली फिर्यादी यांच्याकडून चार लाख ६७ हजार रुपये घेतले. संशयित मोईन याने सदनिकेचा मूळ मालक विजय राजाराम केमसे यांना ही रक्कम दिल्याचे दाखवून ती रक्कम स्वतःच्या फायद्याकरिता वापरून फसवणूक केली. पोलिसांकडून याप्रकरणी अधिक तपास करण्यात येत आहे.

# दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय होणार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे जिल्ह्यातील पौड (ता. मुळशी) येथे लिंक कोर्टऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयाची स्थापना करण्यास व त्यासाठी आवश्यक अशा १२ नियमित पदांना व बाह्य यंत्रणेद्वारे घ्यावयाच्या ४ पदांना, तसेच त्यासाठीच्या आर्थिक तरतूदीस आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.सध्या पौड येथे ठिकाणी लिंक कोर्ट कार्यरत आहे. या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रलंबित प्रकरणांची संख्या व न्यायालय स्थापनेसाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उपलब्धता हा निकष लक्षात घेऊन उच्च न्यायालयाच्या न्यायालय स्थापना समितीने लिंक कोर्ट ऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयाची स्थापना करण्याची शिफारस केली आहे. हे न्यायालय स्थापन झाल्यामुळे पौड येथील प्रलंबित प्रकरणे जलदगतीने चालविणे सुलभ होईल. तसेच नागरिकांसाठी व पक्षकारांची मोठी सोय होऊन, या तालुक्यातील नागरिकांसाठी जलदगतीने न्यायदान प्रकिया राबविता येणार आहे. त्यानुसार मंत्रिमंडळाने आज हा निर्णय घेतला. तसेच या न्यायालयासाठी आवश्यक अशा १२ नियमित पदांना व बाह्य यंत्रणेद्वारे ४ मनुष्यबळांची सेवा घेण्यास मान्यता देण्यात आली. यासाठीच्या वेतन व वेतनेत्तर खर्चासाठीच्या १ कोटी ६४ लाख ९ हजार ८५२ रुपयांच्या तरतुदीसही बैठकीत मान्यता देण्यात आली.

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी तसेच मराठी संस्कृतीचे जतन व्हावे यासाठी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने गुरूवार २७ फेब्रुवारी २०२५ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे. मोरवाडी, पिंपरी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी १० वाजता संपन्न होईल. या कार्यक्रमास सहकार आणि नागरी विमान वाहतूक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत




दादा पाटील, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, नगरविकास, अल्पसंख्यांक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती असणार आहे. याशिवाय खासदार मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महेश लांडगे, अण्णा बनसोडे, शंकर मांडेकर, शंकर जगताप आणि महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य अँड. गोरक्ष लोखंडे यांची सन्माननीय उपस्थिती यावेळी असणार आहे.

या मान्यवरांसह महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर हे देखील या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. गुरूवारी सकाळी सव्वा दहा वाजता महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाने सुरुवात होईल. यामध्ये महाराष्ट्रातील बोली भाषांमधील गीते सादर केली जाणार आहेत. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता 'सुलेखन' या मराठी भाषेतील अक्षरांना स्वभाव देणाऱ्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध सुलेखनकार शरद कुंजीर हे उपस्थितांना याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. शिवचरित्र किर्तनकार ज्ञानेश्वरी ढगे यांचे सुश्राव्य किर्तन या कार्यक्रमात पार पडणार आहे. दुपारी १२ वाजता व्याख्याते डॉ. शिवप्रसाद महाले यांचे 'युवा शक्तीची स्वर्णिम भारताकडे वाटचाल' या विषयावर युवांना प्रेरणादायी ठरणारे व्याख्यान होणार आहे. दुपारी १ वाजता राष्ट्रीय भारूडकार हमीद अमीन सय्यद यांच्या पारंपरिक लोककलेचा अविष्कार असलेल्या भारुडाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थिती दर्शवावी, असे आवाहन विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी यांनी आवाहन केले आहे.

# नागरिकांच्या रेकॉर्डब्रेक गर्दीने पवनाथडी जत्रेचा समारोप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शहरी आणि ग्रामीण संस्कृतीने नटलेल्या चार दिवसीय पवनाथडी जत्रेचा सोमवारी समारोप झाला. १७ वर्षांची परंपरा अबाधित ठेवत यावर्षीही महापालिकेच्या वतीने पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आले होते. या जत्रेस नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. यावर्षी सुमारे ४ ते ५ लाख लोकांनी पवनाथडी जत्रेस भेट देऊन विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला, वस्तू खरेदी केल्या आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना हजेरी लावली. तसेच सर्व सहभागी बचत गटांची सुमारे १.५ ते १.२५ कोटी रुपयांची उलाढाल या पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून झाली, अशी माहिती समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी दिली.महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांमध्ये विपणन व विक्री कौशल्ये विकसित व्हावी तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरा आणि शहरी संस्कृतीचे जतन व्हावे यासाठी महापालिकेच्या वतीने दि.२१ ते २४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आले होते. सोमवारी या पवनाथडी जत्रेचा समारोप झाला. या समारोप कार्यक्रमावेळी सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार,



उप आयुक्त अण्णा बोडदे, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मोरवाडीचे प्राचार्य शशिकांत पाटील, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, प्रशासन अधिकारी पुजा दुधनाळे, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी नगरसदस्य अशोक सोनवणे, सागर आंगोळकर, सुषमा तनपुरे, सामाजिक कार्यकर्ते आप्पा ठाकर, स्वाती गुरव, अनुश्री धोत्रे तसेच विविध विभागांचे महापालिका अधिकारी, कर्मचारी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.महिला तसेच तृतीयपंथी आणि दिव्यांग बचत गटांचा प्रमाणपत्र देऊन सन्मानबचतगटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू विक्रीचे ३८६ स्टॉल, महाराष्ट्रीयन मराठमोळ्या शाकाहारी पदार्थांचे २१७ स्टॉल, तर मांसाहारी पदार्थांचे १३० तसेच दिव्यांग बचतगटांना ०५, सामाजिक संस्था १४, तृतीयपंथी बचतगट ०४ असे एकूण ७५६ स्टॉल पवनाथडी जत्रेमध्ये होते. सोडत पद्धतीने स्टॉल वाटप करताना काही महिलांच्या हाती काढण्यात आलेल्या चिट्ठीत त्यांचाच नंबर निघाला होता. या महिला बचत गटांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यामध्ये नानाश्री महिला बचत गट, ब्राईट महिला बचत गट, नवीन परिवर्तन महिला बचत गट, अश्विनी स्वयंसिद्धा महिला बचत गट, केजीएम महिला बचत गट, शिवसंगमेश्वर महिला बचत गट यांचा समावेश होता. तसेच यावेळी प्रातिनिधीक स्वरूपात तृतीयपंथी, दिव्यांग बचत गट आणि जनरल, शाकाहारी, मांसाहारी स्टॉलधारक महिला बचत गटांचा सन्मान करण्यात आला.

पवनाथडीच्या माध्यमातून सक्षमा उपक्रमात महिला बचत गटांचा सहभाग वाढविण्यावर भरपिंपरी चिंचवड महापालिका आणि टाटा कम्युनिटी इनिशिएटिव्हज ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सक्षमा प्रकल्प राबविला जात आहे. या उपक्रमाअंतर्गत ५,००० महिला बचत गटांना कौशल्य विकास, आर्थिक साक्षरता आणि व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. सध्या २,५५६ बचत गट या प्रशिक्षणाचा लाभ घेत असून महिलांना स्वयंरोजगार निर्माण करून देण्यासाठी आणि त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी हा प्रकल्प महत्वाकांक्षी ठरत आहे. या उपक्रमाची माहिती जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचावी यासाठी महापालिकेच्या वतीने पवनाथडी जत्रेमध्ये माहिती कक्ष स्थापन करण्यात आला होता. या कक्षाच्या आधारे आणखी महिला या सक्षमा प्रकल्पाशी जोडल्या गेल्या आहेत.पिंक ई-रिक्षा योजनेची माहिती महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी उभारण्यात आला होता स्वतंत्र स्टॉलमहाराष्ट्र शासनाच्या पिंक ई-रिक्षा योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांना देता यावा यासाठी स्वतंत्र स्टॉल या जत्रेमध्ये उभारण्यात आला होता. या स्टॉलच्या माध्यमातून महिलांना या योजनेबद्दल माहिती देण्यात आली. या योजनेअंतर्गत, महिलांना महिला व बालकल्याण विभागामार्फत पिंक ई-रिक्षा प्रदान करण्यात येणार असून अनेक महिलांनी या स्टॉलला भेट देऊन योजनेची माहिती जाणून घेतली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968